नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ०५/०७/२०२२ (मंगळवार)**

**(सायंकाळ)**

---

## विदेशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. केळवद :– अंतर्गत १५ कि.मी. अंतरावरील मौजा उमरी शिवार सावनेर पांढुर्णा हायवे रोड येथे दिनांक ०३/०७/२०२१ चे १८.०० वा. ते १९.०० वा. दरम्यान सुमारास आरोपी क्र. १) पीयूश हरिदास गणविर, वय २६ वर्ष, रा. शिवकॉलनी, शिवमंदिर जवळ बेरडी रोड सौंसर ता. सौंसर जि. छिदंवाडा (मध्य प्रदेश), २) सुरज राजेंद्र दुबे वय २२ वर्ष, रा. काजलवानी जि. छिंदवाडा (मध्य प्रदेश) ता. सौंसर यांनी संगणमत करुन महेन्द्रा बुलेरो गाडी क्र. एमएच–४०/सीए– ०७०७ किंमती ८,००,०००/–रु. मध्ये ओसी ब्ल्यु विदेशी दारुचे ३ बॉक्स प्रत्येक बॉक्स मध्ये ४८ नग १८० एमएल च्या निपा एकुण १४४ निपा प्रत्येकी किमंत २००/–रु. प्रमाणे एकुण किंमती २८,८००/–रु. असा एकुण ८,२८,८००/–रु. चा माल अवैध्यरित्या बिनापरवाना वाहतुक करतांना पोलीसांनी लावलेल्या नाकाबंदीच्या ठिकाणी वाहन न थांबविता आरोपीच्या ताब्यात असलेली महेन्द्रा बुलेरो गाडीमधील ओसी ब्ल्यु विदेशी दारुचे २ बॉक्स रस्त्याने फेकुन मंगसा गावातुन हायवे रोड वरील उमरी गावाकडे जात असता आरोपीतांनी आपल्या गाडीने रस्त्याचे बाजुला उभी असलेली फिर्यादीची बलेनो कार क्र. एएच–४०/सीए–०७०७ ला उजव्या बाजुने धडक दिली. आरोपीतांनी बलेनो कारचे अंदाजे १,००,०००/–रु. नुकसान करून आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन पोलीसांनी दिलेल्या आदेशाचे पालन न करता रोडवरिल वाहतुकीस व लोकांना धोका निर्माण होईल अशा स्थितीत अवैध्यरित्या दारू बाळगुन वाहन चालवितांना मिळुन आल्याने दोन्ही आरोपी विरुध्द सदर गुन्हा दाखल करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी पोशि सचिन भगवान येळकर, वय ३१ वर्ष, पो.स्टे. केळवद यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम २७९,३४ भादवि सह कलम ६६(अ) मु.दा.का. सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना सुचनापत्रावर रिहा करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार किशोर ठाकरे मो.क्र. ८००७४९२६५६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर